

REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामयाः

# रेकि ब्रह्म

वर्ष ९वे अंक ८वा । मे २०२१

# चला, आता श्रद्धेची लाट तयार करूया..



कोरोना व्हायरस गेला गेला म्हणता म्हणता मोठ्या लाटेवर स्वार होऊन पुन्हा नव्या जोमाने परतला. अंधाराचा बोगदा संपत आला, संपत आला म्हणता म्हणता आणखीनच खोल गेला. प्रकाशाची तिरीपसुद्धा दिसू नये इतका अंधकार गडद झाला आहे. जिथे पहावे तेथे फक्त निराशा आणि भीति. माणूस माणसाला टाळायला लागला आहे, मनाला तृप्त करणारी स्पर्शातील जादू आता केवळ लुप्तच नव्हे तर काळ्या जादूसारखी भयावह वाटायला लागली आहे.

कोरोनाव्हायरसच्या धुमाकुळामध्ये विज्ञान आपली दिशाच हरवून बसले आहे असे वाटायला लागले आहे. जगाच्या सगळ्या प्रश्नांवर आपल्याकडे आणि केवळ आपल्याकडेच उतारे आहेत असा दर्पयुक्त दावा करणारे विज्ञान आता हताशपणे हातांवर हात चोळीत बसले आहे. विज्ञानाच्या मोठमोठ्या आश्वासनांमुळे सामान्य जन आपला देवादिकांवरचा, धर्मावरचा विश्वास हरवून बसला आहे. सर्कशीतल्या ट्रॅपीझ झोक्यांवर काम करणाऱ्या कलाकाराने दुसऱ्याच्या भरंवशावर आपला झोका सोडावा आणि 'त्या' कलाकाराचे हात आपल्या हातांपासून दूर आहेत हे समजल्यावर त्याचा जो आकांत होईल तसा आकांत आता समाजात पसरला आहे. कोरोनाव्हायरस हा नेमका कोण आहे आणि तो कोठून येतोय याची जाणच नसल्यामुळे

रामायणातील युद्धात मायावी रूपाने लढणाऱ्या मेघनाद बरोबर लढणाऱ्या लक्ष्मणाची अवस्था आज सामान्य आणि असामान्य जनांची झाली असल्यास नवल नाही. युगान युगे समाजाला दिशा देणाऱ्या प्राचीन विज्ञान आणि प्रज्ञावंत वैज्ञानिकांच्या प्रयोगांना अंधश्रद्धा ठरवून बाद ठरवणाऱ्या आणि खदखदा हसणाऱ्या आधुनिक वैज्ञानिकांना त्यांच्या तथाकथित शास्त्राच्या मर्यादा दाखवणाऱ्या कोरोना व्हायरसने धो धो रडवलेय हे सगळे जग पाहत आहेत. आपल्या शास्त्राच्या तोकडेपणामुळे अहंकाराला ठेच लागल्याने आज प्रथमच रुग्णांच्या जागी डॉक्टर लोक रडताना आपण पाहत आहोत. केवढा हा नियतिचा फेरा! मरणारा प्रत्येक रोगी हा केवळ कोरोनानेच मरत आहे हे लोकांच्या मनावर ठामपणे बिंबवणारे डॉक्टर आता बाकिच्या रोगांचा आणि विकारांचा विसर पडल्यासारखे करत आहेत. आणि अर्थातच आजूबाजूला हे काय चालले आहे हे न समजल्याने भांबावलेला सामान्य माणुस भीतिच्या गर्तेत ढकलला जातोय हे दुर्दैव! भीतिची एक त्सुनामीसारखी भयानक लाट आता आपल्या अंगावर चालून येतेय आणि त्या लाटेत आजपर्यंत मानलेल्या सगळ्याच सिद्धांतांचा आणि मुख्य म्हणजे मानवतेच्या मूल्यांचा नायनाट होतोय हे भयावह आहे. पशूतत्वातून वर सरकलेला माणुस पुन्हा एकदा आपल्या पशूत्वाच्या चिखलात उतरायला लागलाय. "उष:काल होता होता, काळरात्र झाली" असे म्हणत पुन्हा एकदा आयुष्याच्या मशाली पेटवायची तयारी आता करायला लागेल अशी परिस्थिती तयार झाली आहे.

ह्या घोंघावणाऱ्या भयानक लाटेला परतवणे आता अशक्य आहे. त्या लाटेने आता कालिया सारखे अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले आहे. परंतु अजूनही आपल्यातला कृष्ण जागा आहे हे साधकांनी ध्यानात ठेवायला हवे. त्या अक्राळ विक्राळ लाटेला काबूत आणण्यासाठी त्या लाटेहून मोठी अशी एक लाट आपल्याला आता तयार करायलाच हवी. भीति जर काळाकुट्ट अंधकार आहे तर श्रद्धा त्या अंधकाराला नष्ट करणारा सूर्य प्रकाश आहे. आपल्यातील श्रद्धा जी आपण साधनेच्या कोंदणात सुखरूप जपून ठेवली आहे ती आता बाहेर काढायलाच हवी. लाखो करोडो साधकांच्या जपून ठेवलेल्या श्रद्धेला आता लाटेचे रूप घेऊन बाहेर पडायला हवे. प्रेम आणि करूणेच्या गंगेला आता आपले विराट स्वरूप धारण करावेच लागेल.

ह्या रामनवमीच्या निमित्ताने आपण हे श्रद्धेच्या लाटेचे कंकण आपल्या हाती घालायलाच हवे. विज्ञानाच्या आधारावर आणि सामान्य जनांच्या जीवावर खेळणारी व्यापारी प्रवृत्ती भले काहीही म्हणो. आपल्याला आपल्या आंतरिक शक्ती आपल्याच संस्कृति मूल्यांचा वापर करून जागवायलाच हव्या. ही काळाची गरज आहे. रेकि, अग्निहोत्र, प्राणायाम, रामरक्षा, रूद्रपाठ, श्री स्वामी समर्थ तारक मंत्र, श्री गुरू यतिवर स्तवन, महामृत्युंजय मंत्र, श्री दत्तबावनी, दिगंबराचा गजर या आपल्याच विभूतिंनी निर्मिलेल्या तंत्रांचा, मंत्रांचा वापर आता मानवाच्या बचावासाठी करायलाच हवा.

हे लिहिताना, आता दोन नविन गोष्टी पुढे येत आहेत. त्या म्हणजे, अमेरिकेतील शास्त्रज्ञांना लक्षात आलेय कि मेलेल्या माणसांमध्ये व्हायरस जीवंत नसतो आणि त्यामुळे मृत्युनंतर कोरोना विकाराला बळी पडलेल्यांचे विधि करायला हरकत नसावी आणि दुसरे म्हणजे हा व्हायरस इतर व्हायरस सारखाच फक्त हवेतून संक्रमण होत असतो. कोणच्याही स्पर्शाने हा पसरत नाही. या दोनही गोष्टी आता आपल्या आत्यंतिक प्रक्रियांना आळा घालण्यास पुरेशा आहेत.

**आता भय बाळगायचे कारण नाही, कोठेही गाफील मात्र राहू नका. नाका–तोंडावरती मुखवटा बांधा जेव्हा कोणाच्या संपर्कात याल तेव्हाच. सगळ्या अध्यात्मिक प्रक्रिया चालू ठेवा. आंतरिक प्रतिकारक शक्ती वाढत ठेवा, कोणाशीही अकारण झगडू नका, संघर्ष टाळा, एकजूटीने रहा. भयमुक्त जगा. तरच एक मोठी शक्तीशाली श्रद्धेची लाट आपण तयार करू शकू.**

**श्री स्वामी समर्थांचे वाक्य कधीच विसरु नका. "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" स्वत:च्या मनाला सांगा, "नि:शंक होई रे मना, निर्भय होई रे मना"**

**अजित सर**
दि, २४ एप्रिल २०२१

गुरुजींनी या पुढील लिंक मध्ये श्री वसंतराव परांजपे यांनी दिलेला संदेश आपल्या सगळ्या मराठी साधकांसाठी रेकॉर्ड केला आहे.

https://talkandcomment.com/p/25fe4b9b06f38cc65f98b0bf




# आपण कधीच एकटे नसतो


एका गुरूंचे तीन शिष्यगण असतात. गुरूंच्या सान्निध्यात ते जवळ जवळ वीसेक वर्षे असतात. एकाचे नाव प्रसाद असते, दुसऱ्याचे प्रकाश आणि तिसरा प्रमोद. गुरूंना आता वाटत असते कि आपण आश्रमाची जबाबदारी आता यातील कोणावरती देऊन आपण हिमालयात जाऊन समाधी घ्यावी. पण कोणाला नेमावे आपल्या पदावर? तीनही शिष्य तसे मातब्बर आणि तेवढेच ज्येष्ठ. मग गुरूंनी विचार केला कि आपण ह्यांची परीक्षा घ्यावी व जो त्यात चांगल्या रितीने उत्तीर्ण होईल त्याला आपल्या जागी नेमावे. मग दोन–चार दिवसात, त्यांनी त्या तिघांना बोलावले व प्रत्येकाला एक एक मिठाईचा तुकडा दिला व सांगितले कि ही मिठाई अशा ठिकाणी जाऊन खायची कि जेथे दुसरे कोणीच पाहणार नाही. मग तिसऱ्या दिवशी येऊन मला सांगायचे काय झाले ते.

तिघेही शिष्य मिठाई घेऊन गेले. प्रसाद आपली मिठाई घेऊन एका बागेत गेला. तेथे पाहीले तर काही लहान मुले खेळत होती. त्याच्या लक्षात आले कि येथे ही मुले पाहतील. मग तो एका विहीरीपाशी जाऊन एकांतात बसला. तेथे कोणीच दिसत नव्हते. पक्षांची किलबिल चालली होती तेवढीच. बाकी तसे माणसांपैकी कोणीच नव्हते. ही छान संधी आहे असे मानून त्याने ती मिठाई मटकावली व हात धुऊन वगैरे आश्रमात परत आला.

प्रकाशही आश्रमाच्या बाहेर पडला हातात मिठाई घेऊन. त्याने वाट पाहीली कि काळोख झाला कि मग आपण ही मिठाई खायची. म्हणजे कोणीच आपल्याला काळोखात बघणार नाही, जसा अंधार दाटला तो गावामधील एका पुलाच्या खाली उभा राहीला. थोडा वेळ पुलावर गाड्यांची रहदारी होती, काही वेळाने पूर्ण सामसूम झाली. तसे त्याने इथे तिथे पाहत कोणीच पाहत नाही असे म्हणून मिठाई गट्ट केली व कार्य पूर्ण झाल्याच्या भावनेने तो आश्रमात परतला.

तिसरा शिष्य प्रमोद पहिल्या दोन शिष्यांसारखाच एकांत स्थळाचा शोध घेत आश्रमाबाहेर पडला. त्याने जेथे माणसांचा वावर नसतो अशा नदीकाठावर जायचा विचार केला. संध्याकाळ होत होती. काही बायका अजूनही पाणी भरायच्या निमित्ताने तेथे थांबल्या होत्या. प्रमोदला माहित होते कि अंधार पडायच्या आधीच ह्या जातील. आणि तसेच झाले. नदीकाठीही सामसूम झाली. काळोख वाढू लागला. एका झाडाच्या आडोशाला उभा राहून मिठाई खाण्याचा त्याचा मानस होता. म्हणून त्याने खिशातल्या पुडीत ठवलेली मिठाई हातात घेतली आणि इथे तिथे न्याहाळले तर त्याला एक कबुतर त्या अंधारात सुद्धा झाडावरून त्याच्याकडे पाहत असल्याचे त्याला दिसले. त्याने मिठाई पुन्हा खिशात टाकली आणि दुसरीकडे गेला. कितीही म्हटले तरीही त्याला प्रत्येक ठिकाणी कोणी ना कोणी तरी असल्याचा भास होत होता. एका ठिकाणी कोणीच नाही असे बघून तो मिठाई खाणार तेवढयात त्याच्या लक्षात आले कि आपण कधीच एकटे नसतो. आपल्या गुरूंचे शब्द त्याला आठवले कि प्रत्येक साधकाच्या बरोबर प्रत्येक क्षणी प्रत्यक्ष परमेश्वर असतो. मग त्याच्या लक्षात आले कि अशी जागाच ह्या पृथ्वीवर नाही कि जेथे आपल्या बरोबर कोणी नाही. तो तसाच आश्रमात परत आला.

तिसरे दिवशी तिघेही आश्रमात गुरूंसमोर आले. प्रसादने सांगितले कि त्याने काळोखात जेथे कोणीच त्याला पाहणार नाही अशा ठिकाणी जाऊन मिठाई खाल्ली. प्रकाश म्हणाला, “मला खूप फिरावे लागले. पण शेवटी अशी एक जागा मिळाली पुलाखाली कि जेथे कोणीच मला पाहिले नाही. मी तेथेच मिठाई खाल्ली.” प्रमोद मात्र मान खाली घालून गुरूंसमोर आला आणि त्याने हात पुढे करून गुरूंना आपल्या हातातली मिठाई परत देऊ केली. गुरूंनी विचारले, “प्रमोद, का नाही खाल्लीस मिठाई?” प्रमोद म्हणाला, “गुरूजी, मी खूप भटकलो. बऱ्याच जागा शोधल्या परंतु मला एकही जागा अशी भेटली नाही कि जेथे कोणीच नाही. मनुष्य, प्राणी, पक्षी कोणीच नसले तरीही तो परमेश्वर मला सतत पाहत होता. म्हणून मी मिठाई खाऊ शकलो नाही.” गुरूंनी त्याची पाठ थोपटली, आपल्या कवेत घेतले आणि ते म्हणाले, “बाळा, तू खरेच माझा गुणी शिष्य आहेस. तूच माझ्या गादीवर बसण्यास योग्य आहेस.”



# अष्टावक्र गीता

(भाग ८) प्रकरण २

**अजित सर**

### प्रकरण २: श्लोक पहिला:

**जनक– उवाच**

अहो निरन्जना शान्तो बोधोऽहं प्रकृते: पर: ।
एतावन्तामहं कालं मोहेनैव विडंबित: ॥ १ ॥

**अर्थ:** मी निष्कलंक आहे, पूर्ण शांत आहे, शुद्ध चैतन्य आहे आणि प्रकृतिच्या पलिकडे आहे. आजपर्यंत मी मायेच्या जंजाळात फसलो होतो.

### श्लोक दुसरा:

यथा प्रकाशयाम्येको देहमेनं तथा जगत् ।
अतो मम जगत्सर्वमथवा न च किंचन ॥२॥

**अर्थ:** जसे या देहाला मी एकटाच प्रकाशित करतो तसेच या विश्वाला मीच प्रकाशित करतो. म्हणून एकतर सगळे जग माझे आहे किंवा माझे काहीच नाही.

जनकाने येथे एका क्षणात अष्टावक्रांचे तत्वज्ञान स्विकारले. अर्जुनासारखा प्रश्नांचा भडिमार नाही केला.

### श्लोक तिसरा:

सशीरमहो विश्वं परित्यज्य मयाऽधुना ।
कुतश्चित्कौशलादेव परमात्मा वोल्क्यते ॥३॥

**अर्थ:** आश्चर्य आहे कि शरीरासहित विश्वाला त्यागून एका उपदेशानेच परमेश्वराला पाहू शकतो.

राजा जनकाला आत्मज्ञान प्राप्त झाले. आत्म्याचे पूर्ण स्वरूप त्याला प्राप्त झाले. ज्या शरिराला तो आपण समजत होता तसेच ह्या विश्वाला तो ज्या दृष्टीने पाहत होता, ते सर्वच एका क्षणात सुटले. हे सुटण्यासाठी त्याला त्याचा त्याग करावा लागला नाही.

त्याग करण्याच्या मागे अहंकार आहे. कर्तापण आहे. त्याग खरे तर एक बोधाचे फळ आहे. त्यागाचा अर्थच मुळात काहीच सोडायचे नाही. हे सर्व ईश्वराचे आहे ही भावना असायला हवी. आपले जर काहीच नाही तर त्याग कसला करायचा? सोडायचे काय?

### श्लोक चौथा:

**यथा न तोयतो भिन्नास्तरंगा: फेनबुदबुदा: ।**
**आत्मनो न तथा भिन्नं विश्वमात्मविनिर्गतम् ॥४॥**

**अर्थ:** जसे जलातील तरंग, फेस, बुडबुडे हे जलापासून वेगळे नसतात,
तद्वतच विश्व आत्म्यापासून भिन्न नसते पण आत्म्यापासून तयार होत असते.

जसा मातीचा घडा हा मातीपासून भिन्न नसतो पण त्याच मातीला रूप आणि नाम दिल्यानंतर तिचा घडा बनतो तसेच.

### श्लोक पांचवा:

**तन्तुमात्र भवेदेव पटो यद्वद्विचारत: ।**
**आत्मतन्मात्रमेवेदं तद्वद्विश्वं विचारितम् ॥५॥**

**अर्थ:** जसे विचार केल्यानंतर समजते कि वस्त्र हे शेवटी धाग्यांपासून बनलेले असते. तसेच विचार केल्यावर लक्षात येते कि हे विश्वसुद्धा आत्म्याच्या धाग्यापासून बनलेले असते. ते आत्म्यापासून भिन्न नाही.

वैज्ञानिक त्याला विद्युत म्हणतात. परंतु त्यांना हे कळत नाही कि ह्याचे मूळ केवळ आत्मचेतना आहे.सगळीकडेच आत्मचैतन्याचा प्रभाव आहे.

## The Wave Of Faith

| | | |
|---|---|---|
| **यज्ञ** | **महामृत्युंजय** | Rakesh V Kumar: 9820082454<br>Kalpita V: 9220872994 |
| | रुद्र स्वाहाकार | |
| **Distance** | **Reiki** | Aruna Margam: 725-962-0868 |
| **Chanting** | रुद्र | Jairam Athalekar: 9867384039 |
| **Chanting** | राम रक्षा | Babasaheb Kirpekar: 9850050663<br>Pranjal Joshi : 9850035736 |
| **Chanting** | दत्तबावनी | Shripad Joglekar: 9099976984<br>Siddhi Joglekar: 9725001354 |
| **Chanting** | तारक मंत्र | Meena Bhave: 9909925815<br>MrunalKutumbale: 8758893063 |
| **Chanting** | यतिवर स्तवन | Ashwini Telang: 9082062252<br>Krupa Choksi: 8160488127 |
| **Chanting** | दिगंबरा | Vishal Shridhankar: 9967639636<br>Kalpita Keer: 7218498799 |



# लहानपणी नकाराची लस आवश्यक..

सौ वंदना तेलंग

आपण सगळेच जाणतो कि लहानपणी इवल्याश्या बाळाला केवढया लसी घ्याव्या लागतात. पहायला कितीही वाईट वाटले तरीही आपल्याला एक पालक या नात्याने आपल्या बाळाला घेऊन दवाखान्यात तेवढयासाठी जावेच लागते. आपल्याला हे माहीत असते कि त्या लसीच्या इंजेक्शनने त्या बाळाला किती वेदना होतात, एखाद दोन दिवस तापही येतो. परंतु त्या लसीने त्याला आयुष्यात पुढे येणाऱ्या विकारांचा त्रास होऊ नये म्हणून आपण ही काळजी घेतो. साधारणत: ह्या लसी पोलियो, कांजण्या, देवी, टी.बी. इत्यादि रोगांपासून मुलांना वाचवण्यासाठी प्रतिकारक शक्ती मुलांमध्ये वाढवते. ह्या लसी घ्यायला आपल्याला दवाखान्यात जावे लागते.

परंतु काही लसी ज्या शरीरापेक्षा मनासाठी आवश्यक असतात त्या मात्र आई–वडीलांना घरीच द्याव्या लागतात, शरीराच्या रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या गोष्टी सगळे जग करते पण मुळातच बहुतेक विकार हे मनाचे असूनही आपले त्याकडे लक्षही नसते. आमच्या लहानपणात आम्ही मोठया परिवारामध्ये मोठया कौतुकाने आणि लाडाने वाढलो खरे पण फाजील लाड मात्र कधी व्हायचे नाहीत. बहुतेक हट्ट कधी पुरवले जायचेच नाहीत. त्यावेळी खूप वाईट वाटायचे पण नंतर लक्षात यायला लागले कि आपल्या गरजा पुऱ्या करायला आमच्या पालकांनी कधीच नाही म्हटले नाही. पण शौक आले कि मात्र घरातून ठाम नकार मिळायचा. मोठे झाल्यावर लक्षात यायचे कि बाहेरचे जग काही प्रत्येक गोष्टीला होकार नाही देणार. प्रत्येक हवी असलेली गोष्ट स्वत:ला स्वकर्तुत्वावर मिळवावी लागणार, हे बाळकडू लहानपणीच मिळाल्यामुळे बाहेरच्या नकारांची आम्हाला फारशी फिकीर वाटली नाही. आमच्या सहनशीलतेच्या कक्षा लहानपणीच रूंदावल्या गेल्या.

परंतु आजकाल आपण पाहतो कि छोट्या परिवारामुळे आणि त्यात सुद्धा जेथे नवरा आणि बायको दोघेही दिवसभर बाहेर राहून कमावत आहेत अश्या परिवारामध्ये जास्त करून मुलांचे सगळेच लाड पुरवण्याकडे कल असतो. कदाचित आपण आपल्या मुलाला वेळ देऊ शकत नाही याची खंत आई–वडीलांना सतावत असते आणि ते स्वत:ला मुलाचा गुन्हेगार समजत असतात. मग अशी त्याच्या बदल्यात मुलाचे सगळेच लाड, हट्ट आणि कोड कौतुके पुरवायची गरज त्यांना भासत असावी. मग मुलांनी काही मागायचा अवकाश कि आई–बाबांनी ते तत्परतेने आणुन दिलेच समजा. अशा घरातील मुलांना नाही हा शब्द कधी ऐकावा लागत नसल्याने त्या शब्दाची सवयच नसते. मग यौवनाच्या उंबरठयावर ही मुले जेव्हा समाजामध्ये काहीना काही भूमिका घेऊन उतरतात तेव्हा समाज काही त्यांना सहजा सहजी प्रत्येक गोष्टीला होकार देत नाही. सामाजिक जीवनातल्या पहिल्या नकारालाच मग हा युवक बिथरतो आणि तो नकार सहन करायचे सामर्थ्यच नसल्यामुळे मग एक तर स्वत:च्या जीवाचा शेवट करून घेतो नाहीतर हिंसक बनून जगाचा शेवट करायला उद्युक्त करतो.

हे लक्षात ठेवून आई–वडीलांना आपल्या मुलाच्या सगळ्याच मागण्या मान्य न करता काही मागण्यांना जाणून बुजुन नकार देणे आवश्यक आहे. काही काळ पालकांचा मुलांशी संघर्ष होईल खरा पण मग मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते किती गरजेचे आहे ते पालकांना समजून येईल. आपले मूल जगात जगून सन्मानाने आयुष्यातील चढ उतारांना सामोरे जायला अगदी तयार होईल. एका यशस्वी जीवनाचा हा पाया बनून जाईल इकडे पालकांनी लक्ष द्यावे.

(लेखांक २०)

# जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

## माझा स्वत:चा अनुभव..

**अजित सर**




साधारण २००१–०२ चा काळ असावा. माझ्या आयुष्यातील हा दगदगीचा काळ. स्वत:चा उद्योग, घर संसार आणि त्याच बरोबर रेकिचे स्वामींनी दिलेले कार्य आणि त्यात होणारा प्रवास, अवेळचे जेवण खाण, थोडेसे अनियमित जीवन ह्या सगळ्या धावपळीत थकायला नाही झाले तरीही दगदग ही जाणवायचीच, अचानक शरीराच्या उजव्या बाजूला बरगडीखाली वेदना व्हायच्या. रेकि शिकवताना शरीराच्या रचनेबद्दल अभ्यास केल्यामुळे कळायचे की यकृतामध्ये काहीतरी कुरबुर सुरू झाली आहे. परंतु ॲलोपॅथीच्या मर्यादा आणि त्यातील दोष याचा अभ्यास आणि रेकि शास्त्रावरचा गाढा विश्वास यामुळे कित्येक वर्षे ॲलोपॅथीच्या वाट्याला जाणेही झाले नव्हते. पूर्वीचे अनुभवही काही विश्वास ठेवावा असे नव्हते. धकाधकीत वेळही मिळत नव्हता. रेकि घ्यायचो, स्वामींची उपासनाही चालूच होती. आपल्याला दुखतेय आणि काहीतरी करायला हवे एवढेच फक्त माहीत होते. आणि स्वामी बरोबर होतेच कि! आमच्या कोकणीत दोन छान शब्द आहेत, “देवाक काळजी” म्हणजे त्या देवाला सगळी काळजी.

मी राहायचो बोरीवली उपनगरात. माझे कार्यालय चर्चगेटला. म्हणजे मुंबईच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला दररोजचा प्रवास. मुंबईची लोकल हे नेहमीचे वाहन. असाच एका सकाळी साधारण नऊच्या सुमारास बोरीवली रेल्वे स्थानकावर आलो. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर गाड्या उभ्या होत्या. इंडीकेटरवर पाहत होतो कि कोठल्या प्लॅटफॉर्मवर जावे लागेल तेवढयात अचानक पासच्या रांगेत माझाच एक साधक मुकेश दिसला. त्याची आणि माझी नजरानजर झाली आणि त्याने खूणेनच मला थांबायला सांगितले. मी त्याच्या रांगेत त्याच्याकडे गेल्यावर तो म्हणाला, “सर, काही बोलायचे आहे. महत्वाचे आहे.” त्याचा पास काढून झाला आणि तो म्हणाला, “आज सकाळीच एक छान स्वप्न पडले, ते विस्तृतपणे सांगायचे आहे. वेळ आहे का सर?” मुकेश हा तसा एक दिलखुलास माणुस आणि अतिशय सात्विक साधक. मी त्याला म्हटले कि चल. वेळ काढूया. तुलाही वेळ असेल तर घरी जाऊन मस्त चहा घेऊ या. माईलाही तुला भेटून बरे वाटेल. तोही तयार झाला.

घरी आल्यावर त्याने बैठक मारली आणि म्हणाला, “सर, आज पहाटेच्या सुमारास मला एक स्वप्न पडले. एकदम स्वच्छ आठवतंय. पण त्याचा अर्थ मला कळत नाही.” मी म्हटले, सांग बघू पूर्णपणे, त्याने स्वप्न सांगायला सुरूवात केली. त्याच्या स्वप्नात श्री स्वामी समर्थ आले. ते त्याच्या घरीच रहात होते. स्वप्नातलाच रात्रीचा प्रसंग असेल. स्वामी त्याला म्हणाले, “अरे, माझ्या उजव्या कुशीत बरगड्यांखाली खूप दुखतेय. जरा डॉक्टरांना घेऊन ये.” मी पटकन आमच्या गिरगावच्या डॉ. नेन्यांना बोलाविले. त्यांनी स्वामींना तपासायला सुरूवात केली. थोडयाच वेळात डॉक्टर घामाघूम झाले. घाबरल्यासारखे वाटले. म्हणाले, “मी आता जातो. मला काहीच कळत नाही. हे मानवी शरीर नाही आहे. या शरीरात मला यकृताशिवाय कोणताच अवयव जाणवत नाही. माझ्या शास्त्रात हे समजत नाही.” आणि असे म्हणून डॉक्टरांनी अगदी धूमच ठोकली. मुकेश पुढे म्हणाला, “स्वामी पोट धरधरून हसले. म्हणाले बघ, “कसा घाबरून पळाला”. मग म्हणाले “हे बघ हे असे असे औषध खालून केमिस्टकडून घेऊन ये. त्याबरोबर त्याच नावाचा हा असा असा बाम पण आण”. मी धावतच खाली गेलो. दोनही औषधे मिळाली ती घेऊन आलो. स्वामींना त्यातील एक गोळी दिली आणि वरती पाणीही दिले प्यायला. स्वामींनी गोळी घेतली आणि बाम स्वत:च्याच हातांनी स्वत:च्या यकृताच्या स्थानावर चोळला. एक श्वास जोराने घेतला आणि म्हणाले, “झालो बरा. आता तू झोप”.

याचा अर्थ मुकेशला जाणून घ्यायचा होता. त्याच वेळेला मला काही संकेत मिळत होते. मी मुकेशला विचारले, "मुकेश, अरे मला सांग औषधाचे नाव काय? बामचे नाव काय?" मुकेश ओशाळवाणेपणाने म्हणाला, "सर, साफविसरलो मी नाव. उठेपर्यंत लक्षात होते. पण आता काहीच आठवत नाही." मी घायकुतीला आलो होतो. कारण माझ्या लक्षात येत होते कि ही औषधे स्वामी माझ्यासाठी सुचवत आहेत. मी पुन्हा पुन्हा विचारत राहीलो. शेवटी आपल्या स्मृतिला ताण देत मुकेश म्हणाला,"दोनही औषधांची बाहेरची कव्हरे पिवळ्या रंगाची होती. आणि त्यांची सुरूवात 'टी' या इंग्रजी अक्षराने होती." यापुढे त्याला काहीच आठवेना. बराच वेळ बसूनही त्याला यापुढे जाता आले नाही. मग तो आपल्या ऑफीसला निघाला. मी तर जाणेच रद्द केले. म्हटले, "स्वामी संकेत देत आहेत आणि ते आणखीही काहीतरी सांगतील."

दुपार गेली. साधारण चार वाजण्याच्या सुमारास आपलेच आणखी एक साधक सिंह नावाचे. तेही आले. ह्यांचा स्वत:चा व्यवसाय होता. त्यांच्या व्यवसायात त्यांना मदत म्हणून मी माझ्या आवाक्यानुसार, माझ्या तीसेक वर्षांच्या व्यावसायिक अनुभवांवर आधारित काही सल्ले द्यायचो. त्यानुसार त्यांना माझ्या एका ओळखीच्या औषधी कंपनीचे काही काम मिळावे म्हणून पाठविले होते. त्यासंबधीच बोलायला आले होते. म्हणाले, "त्या व्यक्तीशी दिलखुलास मुलाखत झाली. कामाचे काही आश्वासन मिळाले वगैरे. त्यांनी त्या कामासंबंधांतील काही कागद पत्रे दिली आहेत ती दाखवतो." असे म्हणून त्यांनी आपल्या जवळील बॅग माझ्यासमोरच उघडली. पटकन माझ्या नजरेसमोर त्या बॅगेत पिवळ्या रंगातील दोन गोष्टी दिसल्या. म्हटले, "का हो सिंह, काय घेऊन फिरताय बॅगेत?" ते क्षणभर चमकले. अचानक आठवल्यासारखे करून म्हणाले, "अरे हां, सांगायचे राहीले. त्यांनी एक नविन प्रॉडक्ट बाजारात आणलाय. त्याची सॅंपल्स दिली आहेत. एक गोळ्यांच्या स्वरूपात आहे आणि दुसरे मलमाच्या स्वरूपात.




माझ्या लक्षात पुन्हा संकेत आला. म्हटले, "सिंह, त्या औषधांच्या नावाची सुरूवात 'टी' अक्षराने होते आहे का? असल्यास माझ्याकडे दे बाबा ते." सिंह गांगरले व म्हणाले, "हो. पण तुम्हाला कसे कळले?" मी म्हटले, "बाबा, ईश्वरी शक्ती अगाध आहे रे." त्याने माझ्याकडे ती औषधे सोपवली. मी त्याचे धन्यवाद मानले.

ते गेल्यावर मुकेशला फोन केला. विचारले कि ती औषधे ट्रायमॉल होती का? तो आश्चर्यचकित झाला. म्हणाला, "आता आठवले. हेच औषध मी स्वप्नात पाहीले." माईला म्हटले, "मुकेशच्या स्वप्नाचा अर्थ उलगडला. स्वामींनी औषधे पण पाठवली. धन्य झालो मी. मग त्या गोळ्या कशावर आहेत वगैरे न बघता त्यातील एक गोळी श्रद्धेने घेऊन टाकली. बाम काढून उजव्या कुशीत चोपडला. थोडा वेळ पडून राहीलो. त्यानंतर आजपावेतो काहीच तक्रार नाही यकृताची. ती वेदना कशी गेली याचा थांगपत्ताच नाही लागला. ही सगळी स्वामींचीच किमया. स्वामीच जेव्हा औषध देतात तेव्हा कोठल्या रोगाची हिंमत आहे आपल्याला पीडा देण्याची.

# अनुष्ठानातील दिनंदिनी

**तेजश्री रानडे, देवगड**

महाशिवरात्रीतील एका महिन्याचे अनुष्ठान म्हणजे काही साधकांना तपस्येची पर्वणीच असते. आपले बरेचसे साधक याच कारणासाठी महाशिवरात्रीची आतुरतेने वाट पाहत असतात. यावर्षीही कोविडच्या गदारोळात आपल्या असंख्य साधकांनी अनुष्ठानाचा वसा उचलला आणि साधनेत आणखी एक पाऊल पुढे टाकले. आपल्यातीलच एक साधिका देवगडची तेजश्री रानडे जी एवढया छोटया वयातही एक अतिशय प्रतिभावंत लेखिका आहे तिने अनुष्ठानाच्या काळात दर दिवशी मला पत्ररूपाने दैनंदिनी लिहायचे व्रत घेतले. तिची ती पत्रे साधनेच्या दृष्टीने अतिशय महत्वाची ठरतील हे नि:संशय! या अंकापासून वेगवेगळ्या भागात आपण ही पत्रे प्रकाशित करत आहोत. त्यातला आजचा हा पहिला भाग.

**अजित सर**

या वर्षी अनुष्ठान सुरू झाल्यावर रोज एक पत्र तुम्हाला लिहायचं ठरवलं होतं त्याप्रमाणे लिहीत आहे. दरवर्षीप्रमाणे उत्साह, आनंद तर आहेच अनुष्ठानाचा, पण का कोण जाणे यावर्षीचे अनुष्ठान वेगळे ठरणार आहे असे माझेच मन मला सांगत आहे. दरवर्षी मी एक प्रक्रिया म्हणून अनुष्ठान करत होते परंतु या अनुष्ठानात केवळ नियम पाळणे यावर मर्यादित न राहता, खऱ्या अर्थाने शुद्धीकरण होणार हे जाणवत आहे. येणारे सर्व अनुभव मी तुमच्या पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे. तुम्ही नेहमीच माझ्यासोबत आहात याची खात्री आहे माझ्या मनाला. तरी काही चुकलं माकलं तर क्षमा करा मला. ही पत्ररूपी पुष्पे तुमच्या चरणी अर्पण करत आहे.

**तुमची तेजू.**

## दिवसः पहिला  ११ फेब्रुवारी २०२१

आज अनुष्ठानाचा पहिला दिवस. ज्या अनुष्ठानाची मला दोन महिने आधीच चाहूल लागते, एक वेगळाच उत्साह संचारतो ते अनुष्ठान अखेर आजपासून सुरू झाले. अनुष्ठानाचा हा एक महिना मला नेहमीच आंतरिक परिवर्तनाचा काळ वाटतो. हे माझे नववे अनुष्ठान आहे. खरे म्हणजे साधना अशी कोणत्याही मापांत आणि आंकड्यांत मोजता येत नाही आणि तसा प्रयत्नही करता कामा नये नाहीतर अहंकार उफाळून येतो. मी फक्त माझ्यामध्ये ह्या गेल्या आठ वर्षांमध्ये कोणते बदल झाले याचा संदर्भ म्हणून हा आंकडा वापरत आहे आणि तोही जाणिवपूर्वक.

इथे मला एक उदाहरण सांगायचे आहे जेणेकरून मी माझी अवस्था नीट व्यक्त करू शकेन. बाबा आपल्या मुलाला सायकल चालवायला शिकवतात. प्रथम ते त्याला सायकलजवळ नेतात आणि सायकलची ओळख करून देतात. कोणत्या भागाला काय म्हणतात आणि त्या त्या भागाचे कार्य काय हे



शिकवतात. त्याला पॅडल मारायला शिकवतात आणि मग त्याच्या पाठीमागून त्याला आधार देतात. त्यानंतर मध्येच हळूच हात सोडून देतात. आता मुलाला सायकल चालवायला येते. आता तो उत्तम पद्धतीने वेगाने सायकल चालवू शकतो. येथेच हे प्रकरण संपत नाही. आता मुलाच्या खऱ्या परीक्षेचा काळ सुरू होतो. आजपर्यंत त्याला मोकळ्या रस्त्याची सवय आहे. आता मात्र त्याला वाहनांनी, माणसांनी गजबजलेल्या रस्त्यावरून सायकल चालवायची असते. आज बाबा प्रत्यक्षात नाहीत सोबतीला, आहे ती त्यांची शिकवण. म्हणजे खऱ्या अर्थाने कसोटी आहे. आजूबाजूला लहान मोठ्या वाहनांची ये-जा चालू आहे, त्यांना पार करत सतर्क राहत त्याला घर गाठायचे आहे. जरा जरी बेफिकीरी झाली तर अपघात निश्चित आहे. आज बाबांकडून घेतलेल्या ज्ञानाची परिक्षाच आहे जणू. अशा वेळेला मुलगा घाबरतो. बाबांनी शिकवलेल्या सर्व गोष्टी आठवण्याचा प्रयत्न करतो. पण भीतीमुळे त्याला काहीच आठवत नाही. त्याला रडू कोसळते. काही सुचेनासे होते. एवढयात त्याला बाबांचे एक वाक्य आठवते, "घाबरू नकोस. मी आहे". आणि तो बसतो सायकलवर. आणि सुरू करतो चालवायला. हळूहळू जमायला लागते. वाटेत वेगवेगळी माणसे, दुकानांचा झगमगाट त्याच्या दृष्टिस पडतो. तऱ्हेतऱ्हेची माणसे, तऱ्हेतऱ्हेची दुकाने हे पाहण्यात त्याचे मन गुंतुन जाते आणि रस्त्यावरचे लक्ष उडते. एकाग्रता ढळते. एवढयात एक भरधाव ट्रक त्याच्या अगदी जवळून जातो. त्यासाठी त्याचा तोल जातो व तो पडतो. हातापायाला लागते, रक्त येते, रडू कोसळते. "बाबा आता काय करू?" नकळत एक वाक्य तोंडातून निघून जाते. इतक्यात तेच वाक्य त्याच्या कानात गुंतते. "भिऊ नकोस मी आहे" त्याला पुन्हा उत्साह संचारतो. त्याची चूक त्याच्या लक्ष्यात येते. आता अवधान हरवायचे नाही. पूर्ण एकाग्रतेने चालवायची सायकल. असं मनाशी ठरवून तो बसतो सायकलवर आणि स्वत:ला सावरत, लक्ष्य रस्त्यावर एकाग्र करून एकदाचा घरी येऊन पोहोचतो. बाबा त्याच्या जखमांना औषध लावतात व हळूवार फुंकर मारतात.

खरंतर ही एक काल्पनिक कथा आहे, पण हे सगळे माझ्याही आयुष्यात घडत आहे असं वाटतंय, आता मी पण त्याच टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. आता थियरी झाली, प्रॅक्टीकल्सची वेळ आली आहे, तुम्ही शिकवलेली प्रत्येक गोष्ट आता कृतीत आणण्याची वेळ आलेली आहे, हे अनुष्ठान कसोटी घेणारं ठरणार असं वाटतंय.

आज अनुष्ठानाचा पहिला दिवस. नकारात्मकतेने अक्षरश: थैमान घातलेय सर! खूप अस्वस्थता येत आहे. खूप कालवाकालव चालू आहे. उदास वाटत आहे. खरे म्हणजे अनुष्ठान करणाऱ्या व्रतीने खूप प्रसन्न असायला हवे, पण मला असं का होतंय कळत नाही आहे. मनाचं तारू भरकटणार तर नाही ना? तुमचा हात माझ्या हातातून सुटणार तर नाही ना? अशा विचारांनी अक्षरश: कंप भरला आहे, खूप रडू येत आहे. वाघाच्या भयाने थरथर कापणाऱ्या हारिणाच्या पाडसाची अवस्था झाली आहे, आपलं मन स्वच्छ आहे ह्या अहंकाराला जबरदस्त धक्का बसला आहे कदाचित.

पण तरीही अंतर्मनाच्या खोलवर तो शंभू महादेवाचा देव्हारा दिसतोय मला. त्यात विराजमान झालेले तुम्हीही दिसताय मला. तुमच्या हातातील पेटलेली मशाल दूरून का होईना दिसतेय मला आणि मला म्हणतेय, "घाबरू नकोस, मी आहे". सर त्या गोष्टीतल्या मुलासारखे मलाही पोहोचता येईल ना घरी? मलाही घरी पोहोचल्याचा आनंद मिळेल ना मला?

The Wave Of Faith

## महा मृत्युंजय मंत्र

ॐ त्रयंबकै यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनं ।
उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मा ऽमृतांत्

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान

**लेखांक १४वा**

**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**



## अंधश्रध्दा अन चमत्कार

अंधश्रध्दा अन चमत्कार यापासून दूर राहा. राजयोगामध्ये देखील जर तुम्हाला कुठे चमत्कार दिसत असेल तर तो ताबडतोब सोडून द्या, नव्हे टाकून द्या. या अंधश्रध्दा, रूढी अन त्यापासून निर्माण होणारे तथाकथित चमत्कार मनुष्याला दुबळे बनवितात. आयुष्यात एकच गोष्ट आपली उत्तम मार्गसर्शक बनु शकते, अन ती म्हणजे 'सामर्थ्य'. अगदी धार्मिक गोष्टी सुध्दा जर आपल्याला चमत्कार म्हणून समोर आणल्या जात असतील, तर त्याचा देखील तात्काळ अस्विकार करा. प्रत्येक गोष्ट जी तुम्हाला दुबळे, हतबल बनविते ती सोडून द्या. हे असे चमत्कार अन अंधश्रध्दा आपली मती गुंग करतात, बुध्दी चालु देत नाहीत, सारासार विचार थांबवितात. परमार्थ करा, पण डोळसपणे. या अंधश्रध्दा अन चमत्काराने आपले फार मोठे नुकसान केले आहे. योग सामर्थ्य सुध्दा चमत्कार म्हणून बघितले गेल्याने बदनाम झाले आहे.

## मध्यम मार्ग असे आपुला !

साधकाने दोन गोष्टींचा अतिरेक टाळावा. अति विलासी, ऐषाराम असे आयुष्य जगून, शरीर भोग करू नयेत. पण त्याचबरोबर अति कठीण उपास तापास करून शरीराची हानी देखील करू नये. अशी व्यक्ती योगी होऊ शकत नाही. गीतेत देखील हेच सांगितले आहे – "जो अति उपास तापास करतो किंवा खुप अन्नसेवन करतो. खुप जागरण करतो किंवा खुप झोपतो, खुप काम करतो वा अजिबात काम करत नाही – यापैकी कोणीच योगी नाही."

(टीप – या समांतर विषयावर मराठीमध्ये एक प्रसिध्द 'फटका' आहे. समाजाला एखादी गंभीर गोष्ट पटवून देणे/सांगणे. म्हणजे 'फटका' हा काव्यप्रकार. कवी अनंत फंदींना 'फटका' ह्या काव्यप्रकाराचे जनक म्हटले जाते. शंकराचार्यांनी संध्येतील २४ नावे म्हणून दाखव असे म्हटल्यावर फंदींनी डफावर थाप मारुन शीघ्र रचना केली अशी आख्यायिका सांगतात.

या विषयावर रचलेल्या फटक्यातील पहिल्या दोन ओळी पुढीलप्रमाणे..

**"बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको, संसारमधी ऐस आपला उगाच भटकत फिरू नको")**

## राजयोगाचा राजमार्ग

अंतिम सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी राजयोगाचे विज्ञान मानवतेपुढे एक व्यावहारिक आणि वैज्ञानिक कार्यपध्दती सादर करते. आपण सर्वप्रथम हे समजुन घेतले पाहिजे कि, प्रत्येक विज्ञानाची स्वत:ची तपासणी करण्याची अन पुढे जाण्यासाठीची एक विशिष्ठ कार्य पध्दती असते. जर तुम्हाला खगोलशास्त्रज्ञ व्हायचे असेल, तर आकाशाखाली "खगोलशास्त्र! खगोलशास्त्र!" असे ओरडत बसुन ते कधीच येणार नाही. तीच गोष्ट रसायनशास्त्राची. रसायनशास्त्र शिकण्यासाठी तुम्हाला भिन्न पदार्थ घेऊन प्रयोगशाळेत जाणे आवश्यक आहे. मग ते एकमेकात मिसळून त्यांवर प्रयोग केला पाहिजे. तसेच खगोलशास्त्रज्ञ होण्यासाठी आपण एखाद्या वेधशाळेत जायला हवे. तेथे दुर्बिणी घेणे आवश्यक आहे, तारे आणि ग्रहांचा अभ्यास करून मग आपण एक खगोलशास्त्रज्ञ व्हाल. प्रत्येकच विज्ञानाच्या अशा स्वत:च्या अभ्यास पध्दती असतात.

मी तुम्हाला हजारो उपदेश करुन काही फायदा होणार नाही. जोपर्यंत तुम्ही स्वत:च्या पध्दतीचा सराव करत नाही, तोपर्यंत खरे म्हणजे काहीच उमगणार नाही.

## ध्यानाचा परिणाम

रात्रंदिवस ब्रम्ह विचार आणि ध्यान करा, मनाच्या एकाग्रतेने ध्यान करा. अगदी तीव्रतेने ध्यान करा. दरम्यान बाह्य जीवनात जागरूकपणे इतरांच्या फायद्यासाठी काहीतरी कार्य करत राहा. इतरांना किंवा तुमच्या मनाला पुन्हा पुन्हा सांगा, "सर्वांचे कल्याण झालेले आहे" असा विचार जरी सातत्याने केलात ना, तरी त्याचा जगाला फायदा होतो. जगात निष्फळ असे काहीच नाही, मग ते कार्य असो किंवा विचार. आपण इथे बसुन केलेले लोक कल्याणकारी विचार-प्रवाह कदाचित अमेरिकेत एखाद्याची परमार्थिक भावना वृध्दिंगत करतील. कोण जाणे!

(कलकत्ता येथील बेलूर मठात एका भारतीय शिष्याशी बोलताना स्वामीजींनी हे उद्गार काढले.)






# श्रीकृष्ण-उद्धव संवाद

संकलकः सौ रजनीगंधा कुडाळकर

प्रभू श्रीकृष्ण स्वर्गस्थ होण्याआधी काय हवे ते माग अशी विचारणा केल्यावर सखा उध्दवाने मनातील जे प्रश्न विचारले ते फार महत्वाचे वाटतात आणि त्यावर प्रभूंनी जी उत्तरे दिली ती त्याहून महत्वाची वाटतात.

**उध्दवाने प्रभु श्रीकृष्णांना प्रश्न विचारले..**

"धर्मराज युधिष्ठीरांना द्युत क्रीडा खेळू नका असं का नाही सांगितलंत? त्या उपर ही खेळायला बसल्यावर फासे जिंकून का दिले नाहीत? नारायणा, नशिबाचे फासे बदलणे हे तुमच्या दृष्टीने किती सहज साध्य किरकोळ गोष्ट ही? तुम्ही तेव्हाही अडवू शकत होतात जेव्हा पांडव धन, राज्य आणि स्वत:लाही हरवून बसलेले होते? त्या राज्यसभेत तुमची सखी असलेल्या द्रौपदीचे हाल होत होते, अगदी वस्त्रहरण होण्यापर्यंतची वेळ आली.. अस का घडलं महाप्रभो! तुम्ही आधीच अडवलं का नाहीत? एवढ सगळं घडूनही तुम्ही सख्याचा धर्म पाळलात अस कस म्हणता?

**प्रभू उतरले,**

प्रिय उध्दवा, हा सृष्टीचा नियम आहे की नेहमी विवेकवानच जिंकत असतो. त्या राज्यसभेत दुर्योधनाकडे विवेक होता आणि धर्मराजाकडे तो नव्हता आणि हेच त्या पराजयाच प्रमुख कारण झालं.

राहिली गोष्ट दुर्योधनाची तर त्याच्याकडे द्युतक्रीडेकरता आवश्यक असलेले धन सामर्थ्य तर खूप होतं पण त्याला फासे टाकण्याचा खेळ खेळता येत नव्हता ही जाणिव ठेवून त्याने मामा शकुनीचा खेळासाठी वापर केला.. जे सर्वथा उचितही होतं यालाच विवेक म्हणतात मित्रा..

जर धर्मराजानेही असाच विचार केला असता आणि मला त्यांच्या बाजूने खेंळण्याचे निमंत्रण दिलं असत तर मी त्याचा आनंदाने स्वीकार केला असता. मग विचार कर मित्रा, मी आणि शकुनी अशा लढतीत कोणाचा विजय झाला असता?

फासे कोणाप्रमाणे वागले असते? कोणाच्या इच्छेबरहुकूम आकडे आले असते?

असो, ते जाऊ दे त्यांनी मला खेळात समाविष्ट नाही केलं ही काही मोठी चूक नव्हती; पण त्यांची विवेकशून्यतेने अशी घोडचूक झाली की त्यांनीच मला विनंती केली की जोवर मला राज्यसभेत बोलवत नाहीत तोवर मी जाऊ नये कारण ते आपल्या दुर्भाग्याचा खेळ माझ्या नकळत खेळू इच्छित होते. द्युत वाईट आहे आणि पांडव द्युत खेळत आहेत हे मला कळू नये असं त्यांना वाटतं होतं.. अशाप्रकारे त्यांनीच मला त्यांच्या विनंतीत बांधून ठेवलं होतं.

तरीही मी बाहेर वाट बघत होतो. कोणीतरी मला बोलावेल. धर्मराजाचं ठीक आहे; पण भीम, अर्जुन, नकुल, सहदेव सगळेच मला विसरले आणि केवळ स्वत:चं दुर्भाग्य आणि दुर्योधनाला दोष देत होते. अगदी दुर्योधनाच्या आदेशाने दु:शासनाने जेव्हा द्रौपदीचे केस ओढत राज्यसभेत आणलं तेव्हा तीसुध्दा तिच्या सामर्थ्यानुसार स्वत: प्रतिकार करत होती तेव्हा तीला माझी आठवण झाली नाही. तिची बुध्दी तेव्हा जागृत झाली जेव्हा दु:शासनाने तीच वस्त्रहरण करायला सुरुवात केली होती. तेव्हा कुठं तिचा "मीपणा" संपला आणि हरी हरी असा धावा करायला सुरुवात केली.. तेव्हा कुठं त्यानंतर मला तीच संरक्षण करता आलं.. माझी आठवण काढली त्याच क्षणी मी तिथं पोचून तिची सहायता केली. आता तूच सांग उध्दवा यात माझी काय चूक होती.. मी काय करू शकत होतो..

### तरीही समाधान न झाल्याने उध्दवाने प्रतिप्रश्न केला..

याचा अर्थ तर असा होतो की "बोलावल्याशिवाय तुम्ही येत नाही.. भक्त संकटात असताना तुम्हाला बोलावण्याची गरज पडावी का?"

### देवकीनंदन उत्तरले,

उध्दवा, या सृष्टीत प्रत्येकाचं आयुष्य हे त्याच्या कर्म फळाशीच बांधल गेलेलं आहे. ना मी ते चालवू शकतो किंवा ना मी त्यात काही हस्तक्षेप करू शकतो. मी तर नेहमीच साक्षीमात्र आहे आणि नेहमीच सोबत आहे. जे काही घडत असत त्याचा मी साक्षी असतोच हाच ईश्वराचा धर्म आहे.

### उध्दवाने पुन्हा प्रतिप्रश्न केला..

वाह प्रभू वाह! याचा अर्थ असा झाला की तुम्ही नेहमीच आमच्या सान्निध्य असणार आणि आमची दुष्कर्म आणि पाप साक्षीभावाने बघत राहणार, आम्ही नेहमीच पापावर पाप करावीत, आमच्या हातून दुष्कर्म घडावीत हीच आपली इच्छा आहे काय?

### त्यावर प्रभू स्मित हास्याने उत्तरले,

हे उध्दवा, शब्दाचा योग्य अर्थ समजून घे. जेव्हा ही यथोचित जाणीव असेल की मी साक्षीभावाने प्रगट आहे तेव्हा कुणी पाप करू शकेल? दुष्कर्म करू शकेल का? चुका घडतील का? निश्चित नाही करणार; कारण कोणतंही पाप, दुष्कर्म तुम्ही तेव्हाच करता जेव्हा तुम्हाला असं वाटू लागतं की तिथे भगवंताची उपस्थिती नाही. त्यामुळे माझ्या नकळत तुम्ही काहीही करू शकता.. आणि नेमक्या त्याच वेळी संकटात सापडता.

धर्मराजाची चूक ही झाली की त्यांना वाटलं की ते माझ्या आदेशाशिवाय द्युत खेळू शकतील आणि मला कळणार नाही. जर त्यांना ही जाणीव असती की प्रत्येक क्षणी, प्रत्येक घडी मी त्याच्या समक्ष साक्षी रुपातच आहे तर त्याचे परिणाम असे झाले असते का? काही वेगळे नसते झाले?

### उध्दव सदगदीत होऊन उत्तरले,

"हे जीवनदर्शन किती खोल आणि महान आहे." पूजापाठ आणि प्रार्थना करून देवाला प्रसन्न करून घेणं ही एक भावना आहे, हा एक विश्वास आहे, पण ज्याक्षणी भगवंत सदैव साक्षीभावाने उपस्थित आहेत ही जाणीव होते त्यावेळी खरोखरच अनुभवता येत की त्यांच्या इच्छेशिवाय पान ही हलू शकत नाही.

आपण हे युध्द श्रीकृष्ण मार्गदर्शनाशिवाय जिंकू शकत नाही हा विवेक विचार जागतिक कीर्तीचा बलाढय धनुर्धर असलेल्या अर्जुनाच्या मनात आला; ज्याची परिणीती महाभारतचे महाबलाढय युध्द जिंकण्यात झाली. तसाच विवेक तुम्हा–आम्हा सर्वांच्या मनात येवो की **सद्गुरुमार्गदर्शनाशिवाय हे आयुष्यच जिंकता येणार नाही आणि क्षणोक्षणी उपस्थित असलेल्या सद्गुरु उपस्थितीची जाणीव होवो, आयुष्यच फलित होवो हीच मालकांच्या चरणी प्रार्थना !!**

**॥ अवधुतचिंतन राजाधिराज योगीराज श्रीमंत सद्गुरु शंकरबाबा महाराज की जय ॥**



# एक काळा ठिपका

**संकलक: श्री प्रांजल जोशी**

अलीकडेच मला इंटरनेट वर एक अद्भूत कथा मिळाली. कथेचे तात्पर्य खरोखरीच डोळ्यात जणू अंजन घालणारे आहे. म्हणूनच ती कथा तुम्हाला सांगितल्याशिवाय मला रहावत नाही आहे, अन माझी खात्री आहे की ही कथा जीवनाबद्दलची तुमची समज पूर्णपणे बदलून टाकेल.

एके दिवशी कॉलेजच्या एका प्राध्यापकाने वर्गात प्रवेश करून मुलांची अचानक परिक्षा घेणार आहे असे जाहीर केले. हे ऐकून सर्वच विद्यार्थी या अशा आगंतुक परिक्षेत प्राध्यापक काय बरे विचारतील म्हणून काहीसे चिंताग्रस्त झाले. प्राध्यापकांनी मग सर्वांना प्रश्नपत्रिकेचे वाटप केले. सर्व विद्यार्थ्यांकडे त्याचे वाटप झाल्यानंतर त्यांनी प्रश्नपत्रिकेचे पान उलगडून परिक्षा सुरु करण्यास सांगितले. प्रत्येकाला आश्चर्य वाटले की चाचणी पेपर मध्ये कोणतेही प्रश्न नव्हते. होता तो फक्त पानाच्या मध्यभागी असलेला एक काळा बिंदू. प्रत्येक जण चकीत होऊन आश्चर्याने प्राध्यापकाकडे पहात राहीला. मग प्राध्यापक विद्यार्थ्यांना म्हाणाले, "प्रश्नपत्रिकेच्या कागदावर तुम्ही जे पहात आहात त्याबद्दल तुम्हाला जे काही वाटते ते प्रत्येकाने आपापल्या उत्तरपत्रिकेमध्ये लिहायचे आहे."

आता आली का पंचाईत! सर्वच विद्यार्थी हतबल झाले होते परंतु दुसरा पर्याय नसल्याने त्यांनी उत्तर लिहायला सुरुवात केली. सर्वांची उत्तरे लिहून झाल्यावर प्राध्यापकांनी सर्व उत्तरपत्रिका गोळा केल्या आणि प्रत्येक उत्तर सर्वांसमोर मोठ्याने वाचण्यास सुरुवात केली.

एखाद दुसरा अपवाद वगळता सर्वच विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेमध्ये दिसणाऱ्या काळ्या ठिपक्याबद्दल लिहीले होते. त्या काळ्या ठिपक्यांची स्थिती, आकार इ. चा उल्लेख करून सर्व उत्तरे वाचल्यानंतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले.

"खरेतर आजची परिक्षा ही कोणालाही गुण व श्रेणी देण्यासाठी नाहीच आहे मुळी. त्यामुळे तुमच्यापैकी कुणालाही या परिक्षेच्या उत्तराबद्दल कोणतीच श्रेणी देण्यात येणार नाही. पण, तुम्ही सर्वांनीच आता मी जे सांगतो त्यावर चिंतन करावे अशी माझी इच्छा आहे."

प्राध्यापकांनी पुढे सांगायला सुरवात केली, "असे बघा, तुम्ही सर्वांनीच प्रश्नपत्रिकेमध्ये दिसणाऱ्या काळ्या ठिपक्याबद्दल लिहीले आहे. कोणीच तो ठिपका सोडून त्याच कागदाच्या पांढऱ्या भागाबद्दल काहीच लिहिलेले नाही. खरं सांगू, आपल्या आयुष्यातही असेच घडते. आपल्या सर्वांकडे एक पांढरा कोरा कागद आहे पण, आपण मात्र एवढा मोठा पांढरा भाग सोडून त्या कागदावरचा इवलासा काळा ठिपका वा डाग, त्याचवर लक्ष केंद्रित करतो. आमच्याकडे आनंद साजरा करण्याची बरीच कारणे आहेत – उदा: आपले पालक, सहकारी, मित्र, चांगले आरोग्य, एक समाधानकारक नोकरी, मुलाचे व मुलीचे स्मित हास्य, इतर एक अनेक कारणे आहेत."

"पण ह्या सर्व आनंदी गोष्टी सोडून, आपण मात्र फक्त काळ्या डागावर म्हणजेच आपली निराशा, आलेले एखादे अपयश, वाटलेली भिती आणि न संपणारी चिंता, आपल्याला त्रास देणाऱ्या गोष्टी, आपल्यावर अन्याय करणारे लोक इत्यादींवरच लक्ष केंद्रित करतो. मग काय? याने आपण आपलीच क्षितीज मर्यादीत करतो. आपल्या रोजच्या जीवनात खूप काही चांगले आहे, आनंददायी आहे पण आपण मात्र आपली सर्व उर्जा निष्कारण अपयश आणि निराशा या क्षुद्र गोष्टींवर केंद्रित करतो."

"काळे डाग आहेत हे अगदी मान्य. पण आपल्या आयुष्यातल्या चांगल्या गोष्टींच्या तुलनेत हे गडद काळे ठिपके इतुकेसे असले तरी ते मात्र आपल्या मनावर मोठी

संकटे आणतात आणि आपल्याला सकारात्मक विचार करूच देत नाहीत. म्हणूनच आपल्या काळ्या ठिपक्यांपासून आपले लक्ष दूर न्या. प्रयत्न करा आणि जीवनाच्या उज्वल बाजूकडे लक्ष द्या. सकारात्मकतेला आपल्या विचारांवर राज्य करू द्या!

आपल्याला प्रत्येक परिस्थितीत सकारात्मक बाजू पहाण्याची गरज आहे. असे करत राहीलात, तर सकारात्मकता हीच आपली धारणा होईल आणि हळूहळू प्रत्येक कृती सकारात्मक होईल.

दुसऱ्या कोणा व्यक्तीबाबत आपले मत बनविताना देखील आपण आपला समज चुकीचा असण्याच्या शक्यतेचा देखील विचार केलाच पाहीजे. जेव्हा आपण हे करू तेव्हाच आपण नि:पक्षपाती निर्णय घेऊ शकू. कोणालाच संपूर्णपणे सत्य माहीत नाही. जेव्हा एखादी व्यक्ती तुमच्या नुसार चुकीची वागत आहे असे वाटत असेल तेव्हा हे लक्षात ठेवा की आपल्याला त्याचे/तीचे संपूर्ण जीवन माहीत नसते. आपण त्याला/तीला फकत एका कोनातून किंवा एका परिस्थितीत पहात आहोत आणि केवळ त्यावरच मग आपण त्याचा/तीचा न्याय करून मोकळे होतो. परंतु जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या वर्तमानामागील सत्य आपल्याला कळते तेव्हा मग आपल्याला त्या व्यक्तीबाबत कळवळा येईल आणि त्या व्यक्तीला आपण क्षमा करू शकू.


लक्षात ठेवा, प्रत्येक अपयश आपल्याला अधिक मजबूत आणि अधिक शहाणे बनवते. आपण काय करू नये हे प्रत्येक अपयश आपल्याला शिकविते आणि त्यातूनच तर आपण परिपूर्णतेकडे जातो.

असे म्हणतात की, 'अनुभव हा उत्कृष्ट शिक्षक आहे.' तर आपल्या अपयशामुळे घाबरू नका. ही यशाची पायरी आहे. अयशस्वी झाल्यावर निराश होऊन हार मानू नका. लक्षात ठेवा की सर्व यशस्वी लोक एकाच प्रयत्नात (एका दमात) यशस्वी झालेले नाहीत. त्यांना देखील संघर्षाचा सामना करावा लागला पण त्यांनी त्यांच्यातल्या भिती, चिंता आणि निराशांवर मात केली. प्रत्येकवेळी जेव्हा आपण अपयशी ठरता तेव्हा हे लक्षात ठेवा, "जे स्वत:ला मदत करतात, देवही त्यांनाच मदत करतो."

जर आपण आपल्या दररोजच्या विचारांचे परिक्षण केले तर आपल्या लक्षात येईल की आपल्याकडे ज्या गोष्टी नाहीत त्याबद्दलच बऱ्याच वेळा विचार करतो. त्याएवजी आपण आपल्याकडे जे आहे त्याबद्दल कृतज्ञता बाळगून सकारात्मक असले पाहीजे.

अशाप्रकारे जर आपण आपली विचारसरणी विकसित करू शकलो तर आपल्या जीवनात कृतज्ञतेची वृत्ती निर्माण होईल, चांगले अन सकारात्मक विचार, चांगल्या कृतीत अन चांगल्या कृती सकारात्मक वृत्तीत अन वृत्ती प्रवृत्तीत बदलतील.

जर प्रत्येक क्षण, प्रत्येक जणाबद्दल आणि ईश्वराने आपल्याला जे काही दिले आहे त्याबद्दल आपला कृतज्ञतेचा दृष्टीकोन असेल तर आपण नेहमीच आनंदात राहू आणि आयुष्यभर आनंदोत्सव साजरा करू शकू. सारे आयुष्यच मग एक उत्सव बनेल.




## The Wave Of Faith

पातालभूतलव्योमचारिणश्छ्दनचारिणः ।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ।। ११ ।।

अर्थ: कपटी जीव जे पाताल, पृथ्वी, आकाश येथे गुप्त रुपाने भ्रमण करतात, ते राम नाम जपणाऱ्या भक्ताला पाहूसुद्धा शकत नाही.

राम नामाचे कवच आपल्या भवती सदैव राहो!

**दत्त बावनी**

https://drive.google.com/file/d/1xVFOf91L3FWkyXV5pOPK7jAKZxj3OoGC/view?usp=sharing

# श्रद्धांजली



एप्रिलचा महिना तसा रेकि विद्या निकेतनच्या परिवाराला दु:खदायकच राहिला. आपल्यापैकी दोन ज्येष्ठ साधक आपल्याला सोडून परमेश्वरच्या चरणी रूजू झाले. पहिला धक्का बसला तो १७ एप्रिलच्या दिवशी जेव्हा निरोप आला कि आपल्या देवरूख मठाचे एक प्रमुख सेवेकरी श्री महेशभाई शुक्ला कोविडच्या साथीत बळी पडले. महेशभाई म्हणजे माझ्या आयुष्यातील एक अतिशय सात्विक माणूस. साधना परिवारातील एक अमूल्य रत्न. अतिशय मृदु भाषी, सज्जन आणि अतिशय प्रेमळ असे हे व्यक्तीमत्व आता हरपले ही कल्पनासुध्दा हादरवणारी आहे. परमपूज्य दादा आठवले यांच्या स्वाध्याय परिवारात तयार झालेले महेशभाई हे आपल्या रेकि परिवारात सर्वांचेच लाडके होते. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी गायत्री उपासनेला वाहून घेतले होते. देवरूख मठात सेवा देणे हे ते अतिशय भाग्याची गोष्ट मानायचे. स्वामींचे एक निष्ठावंत भक्त असलेले महेशभाई कोठल्याही सेवेला तत्पर असायचे; मग तो यश फार्मामधील रेकि शिबिराचा सोहळा असो अथवा गोशाळेसाठी लागणारी काहीही मदत असो. अगदी मृत्युच्या दारात उभे असतानासुद्धा त्यांनी देवरूखची आपली सेवा पार पाडली आणि सात-आठ दिवसांतच आपला देह स्वामीचरणी अर्पण केला. स्वामींनी आता मागे उरलेल्या शुक्ला परिवाराला तसेच रेकि परिवाराला हा आघात सहन करण्याचे सामर्थ्य द्यावे ही स्वामी चरणी प्रार्थना. महेशभाईंच्या निधनाने रेकि परिवारामध्ये एक पोकळी तयार झाली हे नि:संशय. महेशभाईंच्या आत्म्याला स्वामी चरणी स्थान निरंतर राहो.

---





महेशभाईंच्या वार्तेच्या दु:खाचा आघात जिरतो न जिरतो तोच दोन दिवसांनी १९ एप्रिलला आणखी एका आघाताला रेकि परिवाराला सामोरे जावे लागले. राजकोटच्या सौ प्रतिभाबेन चोक्सी यांचे निधन हा एक मोठा धक्का जो सहन करणे परिवार सदस्याना फारच कठीण होऊन बसले. प्रतिभाबेन म्हटले कि डोळ्यांसमोर उभी राहते ती हातामध्ये लेखणी घेऊन कागदांच्या थप्प्यांवर लिहिण्यासाठी सरसावलेली एक प्रसन्न मूर्ति. श्री वासुदेवानंद सरस्वति आणि श्री रंगावधूत महाराजांसारख्या दत महाराजांच्या महान भक्तांची श्री गुरूचरित्राची गुजराती आवृत्ती बनवण्याची इच्छा स्वामींनी ज्यांच्या हातून पूर्ण करून घेतली ती सिद्धहस्त लेखणी प्रतिभाबेनची. 'त्या' एका श्री गुरूचरित्राने खरे म्हणजे प्रतिभाबेनना अमर केले. २०१७ साली श्री स्वामी समर्थ सेवक प्रतिष्ठानतर्फे पहिला महिला पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्रतिभाबेननी नंतर कै गणेश बल्लाळ मुळेकरांच्या श्री स्वामी समर्थ चरित्राचेही गुजराती भाषांतर यशस्वीपणे केले. प्रतिभाबेन म्हणजे सर्वच साधकांसाठी एक आईचे, वात्सल्याचे आणि ममतेचे स्वरूप होते. उतार वयातही गिरनारच्या दहा हजार पायऱ्या चढून श्री दत्त पादुकांचे दर्शन घेणाऱ्या प्रतिभाबेन, नर्मदा परिक्रमेतही उत्साहाने सामिल झाल्या आणि तीही यात्रा त्यांनी लीलया पार पाडली हे त्यांच्या परिपक्व साधनेचे प्रतिकच मानावे लागेल. यापुढील यात्रांमध्ये प्रतिभाबेन शरीराने नसतीलही तरीही स्वर्गातील देवतांच्या यात्रेमध्येही त्यांचे वेगळे स्थान असेल हे नि:संशय. प्रतिभाबेन श्री स्वामी चरणी, दत्त दरबारी दाखल झाल्या परंतु त्यांच्या मागे राहीलेल्या परिवाराला हा आघात सहन करण्याचे बळ स्वामींनी द्यावे ही स्वामी चरणी प्रार्थना!

# आश्रम वार्ता

## (१) देवरूख स्पिरीट्युअल प्रॉवेसचे शैक्षणिक उपक्रम

गेले दोनेक महिने कोरोनाचे संकट दूर गेले आहे असे वाटत असतानाच कोरोनाने पुन्हा एकदा मानवजातीवर तुफानी हल्ला चढवला. रेकिच्या काही शिबिरांनंतर पुन्हा एकदा रेकि शिबिरे स्थगित करून ऑनलाईन अभ्यासक्रमांसाठी देवरूख स्पिरीट्युअल प्रॉवेस या आपल्या साधकांच्या संस्थेने कंबर कसली व आता १३ एप्रिलच्या गुढी पाडव्याच्या मंगल दिनी नवयुगाची आणखी एक गुढी रोवली. २०२१च्या मोसमासाठी सॉफ्ट १, २, ३ आणि ४ तसेच स्ट्रॉंग १, २ आणि ३ ची घोषणा करून साधक वर्गाच्या नव्या पिढीमध्ये एक नवचैतन्य जागवले. मरगळलेल्यांना बाळकडूच जणू मिळाले. हा अंक हाती पडेपर्यंत सॉफ्ट १, २, ३ चे वर्ग संपन्नही झाले असतील व सॉफ्ट ४, मिडल पाथ १ व मिडल पाथ २ ची ५ मे पासून सुरू होणारी सत्रेही सुरू झाली असतील.





# (२) श्रद्धेच्या लाटेची सुरूवात

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचे तडाखे इतस्ततः बसत असतानाच माणसाच्या मनातील भीति आता मर्यादांच्याही पलिकडे पोहोचली आहे जणू काही एका भयानक लाटेचे स्वरूप घेऊन भीति मानवाला गिळायला आलेली आहे. ही महाभयंकर लाट एखाद्या काळ्याकुट्ट विषारी कालीयाचे प्रतिकच जणू, ह्या लाटेला काबूत आणण्यासाठी विज्ञानाच्या आणि मानवी बुद्धीच्या असक्षम ठरत आहेत हे कळल्याने मनुष्यजातीला काहीच न कळत असल्याने एक भांबावल्यासारखी परिस्थिती तयार झालेली आहे. विज्ञानावरील अमाप अंधश्रद्धेने आपण धर्मापासून, अध्यात्मापासून दुरावलो व विज्ञानाचे निराश आणि हताश, असहाय रूप पाहून आपली गात्रे गलित गात्रे झाली अशावेळी करावे तरी काय अशा संभ्रमात पडलेल्या सामान्य जनांना दिलासा तरी कोणी द्यावा? म्हणूनच साधकांनी श्रद्धेची एक प्रचंड लाट तयार करून आपल्यातील श्रीकृष्ण जागा करावा ह्या संकल्पाने गुरूजींनी '**वेव्ह ऑफ फेथ**'ची सुरूवात केली ती राम नवमीच्या दिवशी आणि हजारो साधकांच्या मनातील राम जागा होऊन कोरोना नावाच्या रावणाच्या वधाला सिद्ध झाला. रेकि साधना, रूद्र पठण, दिगंबराची दिव्य धून, दत्त बावनी, स्वामी समर्थ तारक मंत्र, श्री गुरू यतिवर स्तवन, महामृत्युंजय आणि रूद्र स्वाहाकार या सर्व अस्त्रांनी सज्ज होऊन सामान्य जनतेच्या मनातील श्रद्धा जागृत झाली कि भीतिच्या लाटेला पळता भुई कमी पडेल. चला, हृदयातील रामाला आता जागवूया.



श्रद्धेची लाट तयार करण्यासाठी गुरुजींनी सगळ्या साधकांना सज्ज केले आणि भितीवर मात करुन ह्द्यातील प्रितीला जागे करुन आपल्या माऊलीला साद घालण्यासाठी सगळे साधक पुढे सरसावले.

गुरुजींनी या अक्राळविक्राळ अनारोगी समुद्राला चिरून पुढे जाण्याकरिता सगळ्यांना **सकाळी ६ वाजता ३ ओंकार** करण्याचे आव्हान दिले.

चला तर मग आपल्या प्रत्येक दिवसाची सुरवात ३ ओंकाराने करुया. जेव्हा कोट्यावधी ओंकार नाद ब्रंम्हाडात एकत्र निनादेल, तेव्हा या रोगी काळाला परतावेच लागेल. आरोग्यवान, प्रेमळ जग निर्माण व्हावच लागेल!



# आश्रम स्पंदन




"भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" ह्या प्रसिद्ध स्वामी वचनाच्या मागोमाग जर स्वामी भक्तांना दिलासा देणारे आणखी कोठले वचन असेल तर ते म्हणजे, **"हम गया नहीं, जिंदा है"** उपलब्ध स्वामी साहित्यांमधून असे लक्षात येते कि आपला देह सोडल्यानंतर त्वरितच श्री स्वामी समर्थांनी आपल्या बऱ्याचशा भक्तंना अनुभुति दिल्या आणि हे वचन दिले. सामान्य जनांना आधार आणि दिलासा देणारे हे वचन साधकांसाठी मात्र त्यातील गूढार्थासाठी फार महत्वाचे आहे.

ह्या वचनाचा शब्दशः मराठी अर्थ म्हणजे **"मी गेलेलो नाही, जिवंत आहे, मी जागृत आहे."** तसे पहता स्वामींसारख्या पूर्णावताराला अंत नाहीच. पूर्णावतार सोडूनच द्या, सिद्धयोग्यांना सुद्धा खऱ्या अर्थाने मरण नसतेच. मरण किंवा अंत ते स्थूलातील शरीराला आणि सिद्धयोगी व परमेश्वरी अवतार हे तर शरीरात नाममात्रच असतात. ते पूर्णतः चैतन्यमयच असतात. शरीर हे केवळ अवतारकार्य करण्यासाठी केलेली एक दैवी योजना. स्थूल जगामधे राहुन जर जग सुधारायचे असेल तर त्यासाठी स्थूलाच्या रूपात वावरणे हे उचित ठरते अशा अवतारी योग्यांना. चैतन्य हे अविनाशी असते तर स्थूल रूप हे नाशिवंत. चैतन्य हे अमर्याद तर त्याचेच स्थूलरूप मर्यादीत असते. ह्या मर्यादा ओलांडण्यासाठी स्थूलाला पुन्हा मूळ चैतन्य रूपात जावे लागतेच. त्यालाच साधारणतः आपण 'समाधि' म्हणतो.

"हम गया नहीं, जिंदा है" हे श्री स्वामी समर्थांचे वचन सर्वांसाठी आहे. भक्तीच्या मार्गावर श्रद्धेने, शरणभावाने चालणाऱ्या सज्जन, सालस, पापभिरु समाजाला स्वामी दिलासा देत आहेत कि मी आजूबाजूलाच आहे. माझे अस्तित्व आजही चहुंदिशांना जागृत आहे. 'परित्राणाय साधूनां,

विनाशायच दृष्कृतां' मी केव्हाहि स्थूलात अवतीर्ण होऊ शकतो हा भक्तांना स्वामींनी दिलेला दिलासा आहे. समाजातील वाईट, दुराचारी, अनाचारी लोकांना न घाबरता, आपल्या सद्‌भक्तांनी निर्भयपणे, विश्वासपूर्वक जगावे म्हणून स्वामींनी दिलेले हे आश्वासन आहे.

त्याचबरोबर समाजातील दुष्ट प्रवृत्तींना स्वामींनी दिलेली ही जरब आहे. जशी एखादी घार, आकाशात उंचावर विहार करित असताना सुद्धा आपल्या पिल्लांवर बारीक नजर ठेवून असते, अगदी तसेच स्वामी आपल्या बालकांवर नजर ठेवून आहे. 'समर्थाचिया सेवकां वक्र पाहे, असा भूमंडळी कोण आहे?' ही समर्थ रामदासांचीच भूमिका येथे स्वामींची आहे. अक्कलकोटातील लीला १८७८ साली संपविली याचा अर्थ मी ह्या विश्वात नाही अशी चुकीची संकल्पना दुष्ट प्रवृत्तिंनी करून घेऊ नये म्हणून त्यांना दिलेला हा खणखणीत इशारा आहे.

केवळ दुष्ट प्रवृत्तींनाच नव्हे तर साधनामार्गावर चालता चालता, प्रसिद्धी आणि पैसा ह्यांच्या लोभाने ह्या मार्गावरून ढळणाऱ्या साधकांना आणि साधूसंतांना सुद्धा दिलेला हा निर्वाणीचा इशारा आहे. गुरु म्हणजे केवळ शरीराचे, व्यक्तिमत्वाचे नाव नसून ते एका महान, प्रभावी, प्रखर तेजाचा आविष्कार असतो हेच ह्यातून प्रतीत होते. श्री स्वामी समर्थांच्या भक्तिमार्गावर चालताना स्वामींचे पवित्र नाव वापरून आपल्या तुंबड्या भरत, आपल्या किर्तीचे जयघोष करणाऱ्या आणि तथाकथित भक्तांकडून करवून घेणाऱ्या अनाचारी सद्‌गृहस्थांना हा इशारा जेवढया लवकर जाणवेल तेवढे बरे. आपण घालून दिलेली शिकवण, त्यामागील मूल्यें, आचार-विचारांची बैठक आपले भक्तगण व्यवस्थित सांभाळत आहेत कि नाहीत हे आपण पहात आहोत, आपले ह्या साऱ्या गोष्टींवर बारीक लक्ष आहे असेच श्री स्वामी समर्थ ह्या वाक्यातून सुचवित आहेत.

चैतन्याची परिभाषा समजणाऱ्या साधकाला चैतन्याचे अमरत्व समजायलाच हवे. समाधि म्हणजे काय, तर केवळ आपल्या स्वचेतनेला आपल्या सहस्त्रार चक्रामधे नेऊन स्थित करणे हेहि साधकाला माहित असायला हवे. हे तर ज्ञातच आहे कि, सहस्त्रार चक्राचे स्थान हे मानवी शरीराच्या बाहेर असल्याने त्याला शरीरातील चक्रांच्या संख्येत मोजता येत नाही. ह्या चक्रामधे जेव्हा संपूर्ण चैतन्य स्थित होते तेव्हा शरीराची गरज सरते. मग, त्या शरीर सोडण्याच्या क्रियेलाच आपण समाधि म्हणतो. समाधि आणि मृत्यु ह्यात हाच तर फरक आहे. मृत्यु मधे चैतन्य एकतर मोक्षप्राप्तिला जाते किंवा पुनर्जन्माला सिद्ध होते. समाधि मधे मात्र चैतन्य येथेच तर राहते पण पूर्ण सूक्ष्मात. स्वामी स्वरूपानंदांच्या पावस येथील समाधिवर एक सुंदर पाटी लावलेली दिसते. स्वामी स्वरूपानंदांच्या समाधिच्या आधिचे ते शेवटचे उद्गार आहेत असे म्हणतात ते उद्गार असे:

आजकालचे नहोंच आम्ही॥
माऊलीनेच आम्हाला इथं पाठवलं॥
दिलं काम तिच्याच कृपेने पुरं झालं ॥
आता आम्हाला नाही कुठे जायचं ॥
इथंच आनंदात रहायचं॥

**हे "इथंच आनंदात रहाणं" म्हणजेच समाधि.** ह्याच आनंदात आळंदीला श्री ज्ञानेश्वर महाराज इथंच राहीले आहेत. श्री साई बाबा हे इथंच शिर्डीला आनंदात राहत आहेत. श्री रामकृष्ण परमहंससुद्धा इथंच काली मातेच्या मंदिरात आनंदात राहत आहेत. मृत्यु नंतर अस्तित्व मिटून जाते. चैतन्य राहत असेलहि परंतु चैतन्याला स्थूल देहाच्या प्राप्तिसाठी नियतीच्या चक्रातून जावे लागेलच. समाधिचे काही तसे नाही. ते चैतन्य स्थूल शरीराच्या विनाहि चिरंतन असते. ज्या ज्या वेळेला भक्तांची गरज असेल त्या त्या वेळेला ते चैतन्य स्वतःच आपल्या संकल्पाने पंचमहाभूतांचा देह बनवून पुन्हा कार्यरत होऊ शकते.

## ||श्री गुरू यतिवर स्तवन||

रोगानशेषानपहंसि तुष्टा
रुष्टा तु कामान् सकलानभीष्टान् ।
त्वामाश्रितानां न विपन्नराणां
त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयान्ति ॥

ॐ श्री भक्तसंरक्षकाय नमः

